# वर्धा नगर परिषद, वर्धा

परवानगी आदेश क्रमांक/ 71 /नर/बांध/नयव/16

दिनांक : 13 / 5 /2016

प्रति,

**श्री / श्रीमती माँ वैष्णवी सिटी डेव्हलपर्स, वर्धा तर्फे सौ. वंदना राजकुमार देशमुख रा. मोहननगर व इसाजी लेआऊट, वार्ड नं. 23 ,वर्धा**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम , 1966 चे कलम 45 आणि
महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम, 1965 चे कलम 189 (4) अन्वये याव्दारे

संदर्भ :- इमारत परवान्यास मंजुरी व आरंभ प्रमाणपत्र
प्रकार :- आपला अर्ज क्रमांक 189 दि.27.01.2016

उपरोक्त पत्राप्रमाणे आपला अर्ज दि. 27.01.2016
भुखंड क्र.23 शिट क्र. 49/4/अ/1/2 मौजा नालवाडी भुखंडाचे क्षेत्रफळ 542.56 चौ.मि. वार्ड क्र. 23 येथे 542.56 चौ.मि. . रहिवाशी इमारत बांधण्याकरीता मंजूरी मिळण्याचे संदर्भात खालील अटींवर मंजुरी प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

1) समोरील मार्गील व दोन्ही बाजूंनी प्रत्येकी अंमलबजावणीकरीता सोडावयास लागणा-या नियमाचे अंमलबजावणीकरीता म्हणून रिकामी झालेली जागा ही सार्वजनिक रस्त्याचा भाग असेल.

2) कोणत्याही इसमास राहण्याचे प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यत नविन इमारत अथवा तिचा भाग राहण्याकरीता उपयोग अथवा राहण्याकरीता परवानगी घेतलेली / उपयोगी होण्याकरीता नसेल.

3) आरंभ प्रमाणपत्र / इमारत परवाना हे परवाना पत्र मिळालेल्या दिनांकापासून एक वर्षाकरीता वैध राहील.

4) जी जमीन अर्जदाराच्या मालकीची नसेल ती विकसीत करण्यासाठी परवानगी अधिकार देणार नाही.

5) नकाशा मंजूर केल्याप्रमाणे /लाल रंगाने त्यात दुरुस्त्या सुचविल्याप्रमाणे आपल्या घरास /भुखंडास लागुन असणा-या विद्यमान इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीस अनुसरुन प्रस्तावित घराचे / इमारतीचे बांधकाम असावयास पाहीजे.

6) न्हाणी व संडास, स्वयंपाकगृह इत्यादीचे सांडपाणी , घाणपाणी व कचरा याची तांत्रिकदृष्टया योग्य रितीने विल्हेवाट लावावी.

7) अर्जदारास मंजूर नकाशाव्यतीरीक्त त्यात फेबदल करावयाचे असल्यास नगरपालिकेची पूर्व मंजूरी घेणे आवश्यक राहील.

8) मंजूरी करण्यात आलेल्या विकास कामाची / बांधकामाची सोबत पत्रकावरील माहिती सदहू भुखंडावर योग्य जागी सुचना फलक लावून त्यात लिहण्यात यावी. त्याचप्रमाणे जाहिरातीच्या स्वरुपातही माहिती दोन वर्तमानपत्रात (एक मराठी) प्रसिध्द करण्यात यावी.

9) भुखंडात कमीत कमी पाच झाडं लावावीत.

10) सेप्टीक टॅक व्हॅटीलेशन पाईपची उंची स्वत:च्या व शेजारी घराच्या उंचीपेक्षा 10 फुट उंच ठेवावी. व्हॅटीलेशन पाईपच्या तोंडावर डास प्रतिबंधक जाळी लावली, सेप्टीक टॅकव्दारे मैला, इतर सांडपाणी स्वत:च्या खर्चाने पक्की नाली बांधून नगर पालिकेच्या पक्क्या नालीला मिळवावी.

11) बांधकाम परवानगी प्रमाणे प्लीथ लेव्हल पर्यतची कामे नगरपालिका कडुन तपासणी झाल्याशिवाय पुढील बांधकाम करु नये.

12) विना परवानगी बांधकाम साहीत्य, मलमा सार्वजनिक जागेवर किंवा रस्त्यावर टाकू नये. तसे आढळल्यास आपणांवर दंडात्मक जप्तीची कार्यवाही करण्यात येईल.

13) सदहू परवानगी ही प्रामाणि कायदयाबाबत असून , सदर परवानगी तूर्त ज्योत्यापर्यंत धरण्यात यावी.

14) लेआऊट टाकल्यानंतर खोदकामापूर्वी नगर पालिकेचे सक्षम अधिका-याकडून तपासणी झाल्याशिवाय व तसे प्रमाणपत्र दिल्याशिवाय खोदकाम सुरु करु नये. वरील पैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन केल्यास होणा-या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी मिळकत धारकाची राहील.

15) भविष्यात नगर पालिकेला जागा लागल्यास ती समास अंतरातुन विनामुल्य दयावी लागेल.

16) मंजुर अभिन्यास /रेकॉर्ड प्रमाणे जागेची आखणी करुन घेण्याची व मालकी हक्काची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची आहे. नगर पालिकेची काही जबाबदारी राहाणार नाही.

17) ना अनुज्ञेय बांधकाम अर्जदाराने स्वत: दोन महिन्याचे आंत पाडुन टाकावे. अन्यथा नगरपालिका कोणतीही नोटीस न देता पाडून टाकेलच. होणा-या नुकसानीस अर्जदार स्वत: जबाबदार राहील व पाडण्याचा खर्च नगर परिषद वसुल करेल.

19) विद्यमान रस्त्याची रुंदी 4.50 मी. पेक्षा कमी असल्यास रस्त्याचे मध्यापासुन दोन्ही बाजुला 2.25 मी. अंतरापर्यंतची जागा रस्ता म्हणून सोडावी लागेल. याबाबत कोणत्याही प्रकारचा मोबदला मिळणार नाही.

20) रुफस्टाप रेन हार्वेस्टींगची व्यवस्था प्रमाणित करावी तसेच सौर उर्जेवर पाणी तापविण्याचा पध्दतीचा वापर करावा.

21) भूकंप प्रतिबंधक उपाययोजना करुन (नोंदणीकृत स्ट्रक्चरल) इंजिनिअर कडुन आ.सी.सी. डिझाईन करुन घेणे व तसे प्रमाणपत्र नगर परिषद कडे सादर करणे बंधनकारक राहील. तसेच सदर इमारतीचा पूर्णत्वाचा दाखला घेण्यापूर्वी Structural stability बाबत ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

22) विमान प्राधिकरणाचे ना हरकत प्रमाणपत्राबाबत जरी वर्धा शहरात विमानतळ नसले तरी विमानतळ प्राधिकरणाचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची जबाबदारी नगर परिषदेची राहणार नाही. ती आवेदकाची राहील.

23) महाराष्ट्र अग्निशमन अधिनियम, 2006 व नियम 2009 नुसार प्रत्यक्ष साईटवर अग्निशमन व्यवस्था करुन दयावी लागेल . तसेच त्याबाबतचे प्रमाणपत्र अग्निशमन विभागाकडून प्राप्त करुन संबंधितास सादर करणे बंधनकारक राहील.

24) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा यांचे राज्य मार्गावरील (वर्धा-आवी वरील) राज्य मार्गाचे बाजुने इमारत बांधकाम करण्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून स्वतंत्र परवानगी घेऊन त्या विभागाचे अभियंता यांचेकडून सदर जागेची (इमारत रेषा / नियंत्रण रेषा ) तपासणी नकाशामध्ये लाल रंगाने दुरुस्ती करुन घेण्याची जबाबदारी आवेदकाची राहील.

25) घनकचरा व्यवस्थापनाकरीता व्यवस्था करावी लागेल.

26) इमारत बांधकाम व्यावसायीक कामगार यांच्या संदर्भात कामगार विभागानी निर्गमीत केलेले नियम / परिपत्रक /प्रचलीत आदेश यांची जमीन मालक /विकासक यांची पूर्तता करणे बंधनकारक राहील. असे न झाल्यास संबंधित जमीन मालक / विकासक यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही नियोजन प्राधिकरणाकडुन करण्यात येईल.

27) जागेचे मालकी हक्क, क्षेत्र, अनुज्ञेय चटई क्षेत्र इ. बाबत वाद उद्भवल्यास सदरची शिफारस रदद समजण्यात यावी.

28) फ्लॅय ॲश विट चा वापर कंपलसरी करणे.

29) इमारतीवर मोबाईल टॉवरचे बांधकाम परवानगीशिवाय करता येणार नाही.

## सुचना

1) संदर्भाधिन इमारत परवाना व आरंभ प्रमाणपत्राची मुदत आपणांस प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या दिनांकापासुन एक वर्ष पावेतो वैध असतांनाही मुदत दोन महिने अगोदर अर्जदारास पुढील एक वर्षाचे नुतनीकरण करण्याकरीता विहीत नमुन्यात नगरपालिकेत अर्ज करणे आवश्यक आहे.

2) आपण नगर पालिकेत जमा केलेली अमानत रक्कम मंजूर नकाशात प्रारंभ प्रमाणपत्रातील अटीप्रमाणे बांधकाम करणार असल्याची पावती देणे अन्यथा, नगर पालिकेचे पूर्व परवानगीशिवाय आपण बांधकामात केलेले फेरबदल इत्यादी आपली अनामत रक्कम नगरपालिकेचे खाती वळती / जमा होईल.

3) नगरपालिकेने मंजुर केलेल्या बांधकामातील पूर्व परवानगी न घेता केलेले फेरबदल हे अवैध व अनधिकृत असतील. त्यामुळे

अ) आपणास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 आणि महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 चे अंतर्गत कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

ब) आपणांस नगरपालिकातर्फे इमारत वापरण्याकरीता ॲक्युपेशन सर्टिफिकेट आवश्यक असलेले प्रमाणपत्र मिळणार नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्य विज मंडळाकडुन विज पुरवठा आणि नगर पालिका किंवा महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:स्सारण मंडळाकडुन पाणी पुरवठा यापासुन वंचीत राहील.

तरी कृपया मंजुर इमारत नकाशाप्रमाणे आपण बांधकाम करुन नगर पालिकेला सहकार्य करावे.

कार्यालयाचा शिक्का:

नगर परिषद, वर्धा

मुख्याधिकारी,
नगर परिषद, वर्धा

145

सहपत्र : 1) मंजुर बांधकाम नकाशाच्या प्रती
2) सूचना फलकावर नमुद करावयाच्या माहितीचे पत्रक

प्रत माहितीस्तव सादर :

1) मा. जिल्हाधिकारी, वर्धा
2) मा. नगर रचनाकार, नगर रचना, वर्धा
3) कर अधिक्षक, नगर परिषद, वर्धा यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव